


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २७२ • मंगळवार दि.२८ जुलै २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत शेतकरी विकास पॅनलचे वर्चस्व

## माजी आ.जवळगावकर,राजेंद्र केशवे यांचा निसटता विजय





नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत खा.अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलने २३ पैकी २१ जागांवर दणदणीत विजय मिळविला आहे. नांदेडमधून संगिता विठ्ठल पाटील तर हदगावमधून कृष्णा पाटील आष्टीकर हे विजयी झाले आहेत.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत २३ पैकी ११ जागा यापूर्वीच बिनविरोध निवडून आल्या आहेत. माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठका घेवून प्रयत्न केले होते. त्यामुळे ११ जागा बिनविरोध काढण्यात यश आले. परंतु इतर १२ जागांवर एकमत होवू शकले नाही. हदगाव, हिमायतनगर, देगलूर, माहूर, नांदेड, मुदखेड, भोकर, अर्धापूर, धर्माबाद तसेच तीन राखीव मतदारसंघात उमेदवार निवडणूक रिंगणात होते. खा.अशोक चव्हाण, खा.रवींद्र चव्हाण, माजी खा.भास्करराव पाटील खतगावकर, आ.प्रताप पाटील चिखलीकर व अन्य दिग्गज नेत्यांनी मिळून शेतकरी विकास पॅनलची स्थापना केली होती. या पॅनलने १२ जागांवर उमेदवार उभे केले होते. खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी आपले चिरंजीव कृष्णा पाटील आष्टीकर यांना शेतकरी विकास पॅनल मधून निवडणूक न लढविता स्वतंत्ररित्या निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता. बारा जागांसाठी रविवार दि.२६ जुलै रोजी जिल्ह्यातील सोळा मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात आले. आज (मंगळवार) सकाळी लेबर कॉलनी येथील ललीत कला मंडळाच्या सभागृहात मतदान मोजणीला प्रारंभ झाला. नांदेड अ मतदारसंघातून संगिता विठ्ठल पाटील यांनी ३३ मते घेवून विजयी झाल्या आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार अतुल माधवराव वाघ यांना १२ मते मिळाली. वाघ यांच्या विजयासाठी माजी मंत्री डी.पी.सावंत यांनी प्रतिष्ठा पणाला लावली होती. परंतु मतदारांनी संगिता पाटील डक यांच्या गळ्यात विजयाची माळ घातली आहे. डक यांच्या विजयासाठी भाजपातील एक प्रभावी गट प्रयत्नशील होता. त्यामुळे सावंत समर्थक अतुल वाघ यांना पराभव पत्करावा लागला आहे. अर्धापूर अ मतदारसंघातून सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलचे बी.आर.कदम (काका) हे ३० मते घेवून विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी ज्ञानेश्वर बाबुराव राजेगोरे यांना केवळ चार मते मिळाली आहेत. एक मत अवैध ठरले आहे. कदम कामांची दीड दशकानंतर पुन्हा जिल्हा मध्यवर्ती बँकेत इन्ट्री झाली आहे. मुदखेड अ मतदार संघातून शेतकरी विकास पॅनलचे मारोती आनंदराव जाधव यांनी ३५ मते घेवून एकतर्फी विजय मिळविला आहे. त्यांचे प्रतिस्पर्धी मारोतराव पाटील व्यवहारे यांना केवळ एक मत मिळाले. एक मतदान अवैध ठरले आहे. देगलूर अ मतदारसंघाची निवडणूक चांगलीच अटीतटीची झाली असून शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार तथा बँकेचे विद्यमान संचालक विजयसिंह बाळासाहेब देशमुख ४० मते घेवून विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार श्वेता बसवराज पाटील यांना ३७ मते मिळाली आहेत. तीन मतांनी विजयसिंह देशमुख यांनी विजय मिळविला आहे. धर्माबाद अ मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार दत्तात्रय लक्ष्मण रेड्डी हे २७ मते घेवून विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी गोविंदराव शंकरराव जाधव यांना चार मते मिळाली आहेत. दत्तात्रय रेड्डी यांच्या विजयासाठी मराठवाडा जनहित पार्टीने कंबर कसली होती. बिलोली व धर्माबादच्या नगराध्यक्षांनी रेड्डी यांच्या पाठीमागे पाठबळ उभे केले होते. भोकर अ मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलचे राजू गंगाधर जाधव हे विजयी झाले आहेत. जाधव यांना ४७ मते मिळाली असून त्यांचे प्रतिस्पर्धी माधवराव कदम यांना नऊ मते मिळाली आहेत. हगाव अ मतदारसंघात खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी आपले वर्चस्व पुन्हा सिद्ध केले आहे. खा.आष्टीकर यांचा मुलगा कृष्णा पाटील आष्टीकर जिल्हा बँक निवडणुकीच्या रिंगणात होते. आष्टीकर यांना ६२ मते मिळाली असून त्यांचे प्रतिस्पर्धी शेतकरी विकास पॅनलचे चंद्रशेखर राजाराम कदम यांना आठ मते मिळाली असून याठिकाणी एक मत बाद झाले आहे. हिमायतनगर अ मतदारसंघात माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर यांना निसटता विजय मिळाला आहे. जवळगावकर यांना ११ मते मिळाली असून त्यांचे प्रतिस्पर्धी विशाल रामराव राठोड यांना दहा मते मिळाली. एका मताने जवळगावकर हे विजयी झाले आहेत. माहूर अ मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलचे उमेदवार व बँकेचे विद्यमान संचालक राजेंद्र नामदेवराव केशवे हे दोन मतांनी विजयी झाले. केशवे यांना २० मते मिळाली असून त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांना १८ मते मिळाली. इतर मागासवर्गीय (ओबीसी) मतदारसंघातून शेतकरी विाकस पॅनलचे उमेदवार अनिलल पाटील बाभळीकर हे एक हजार ३१ मते घेवून विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी ज्ञानेश्वर राजेगोरे (१६६), श्वेता बसवराज पाटील (६८) यांना मते मिळाली आहेत. या मतदारसंघात १९ मते अवैध ठरली आहेत. अनुसुचित जाती-जमाती मतदारसंघातून शेतकरी विकास पॅनलचे रामचंद्र विठ्ठलराव मुसळे १ हजार ६८ मते घेवून विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी प्रतिभा पुरुषोत्तम येरडलावार (१५४), विजय सोनवणे (३३) मते मिळाली. २९ मते अवैध ठरलेली आहेत. भटक्या विमुक्त जाती-जमाती मतदारसंघातून ज्ञानेश्वर ओमप्रकाश दहिफळे हे ९९० मते घेवून विजयी झाले आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी उकंडराव मोहनसींग जाधव यांना २६२ मते मिळाली आहेत. मतदान केंद्र परिसरात पोलीसांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. यापूर्वी मारोतराव कवळे, पान ४ वर

# नीट पेपरफुटीवरुन लोकसभेत घमासान चर्चा

## ४५ पैकी ४४ आरोपी जामिनावर; नव्या कायद्यांवर विरोधकांचा सवाल

नवी दिल्ली:देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणातील ४५ पैकी तब्बल ४४ आरोपी जामिनावर बाहेर असल्याची धक्कादायक बाब काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी लोकसभेत मांडत केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. पेपरफुटी रोखण्यासाठी आणलेल्या 'सार्वजनिक परीक्षा (अनुचित प्रकारास प्रतिबंध) दुरुस्ती विधेयक, २०२६' वर चर्चा सुरू असताना सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र शाब्दिक चकमक झाली. सत्ताधारी पक्षाच्यावतीने मंत्री जितेंद्रसिंग यांनी विरोधकांना काँग्रेस काळातील पेपरफुटीची आठवण करून देत सडेतोड उत्तर देण्याचा प्रयत्न केला.

गेला आठवडाभर संसदेचे कामकाज ठप्प होते. आज लोकसभेत चर्चेदरम्यान गौरव गोगोई यांनी सरकारच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ४५ पैकी ४४ आरोपी जामिनावर असतील, मुख्य सूत्रधार ११ महिने फरार राहील आणि अटक झाल्यानंतर त्यालाही सहज जामीन मिळेल, तर सरकारची कठोर कारवाई नेमकी कुठे दिसते? असा थेट सवाल त्यांनी सभागृहात उपस्थित केला.दोन वर्षांपूर्वीही सरकारने पेपरफुटी रोखण्यासाठी कायदा आणून मोठी आश्वासने दिली होती. मात्र, प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. उलट, विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत झाला असून दोषींना कायद्याचा धाकच राहिलेला नाही, अशी टीका गोगोई यांनी केली.यावेळी त्यांनी सरकारकडून निलंबित किंवा बदली करण्यात आलेल्या ४७ अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहितीही मागितली. मूळ सूत्रधारांवर कठोर कारवाई करण्याऐवजी कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई करून सरकार स्वतःची जबाबदारी झटकत असल्याचा आरोप त्यांनी केला.विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी सरकारची भूमिका ठामपणे मांडली. राधाकृष्णन समितीच्या ४० पैकी ३५ शिफारशी आधीच लागू करण्यात आल्या असून, परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि पेपरफुटीला कायमचा आळा घालण्यासाठीच हे दुरुस्ती विधेयक आणण्यात आले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या विधेयकाला विरोध करणाऱ्यांना देशातील युवक कधीही माफ करणार नाहीत, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.दरम्यान, या महत्त्वाच्या विधेयकावर सुरुवातीला सहा तास चर्चा निश्चित करण्यात आली होती. मात्र, विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सर्वपक्षीय सहमतीने चर्चेचा कालावधी आठ तासांपर्यंत वाढविण्याची घोषणा केली. आवश्यकता भासल्यास दहा तासांपर्यंतही चर्चा करण्यास सरकार तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

# नांदेडसह ५ जिल्ह्यांत विशेष न्यायालये; राज्यात नवीन ८ न्यायालय

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्वाचे निर्णय

मुंबई/प्रतिनिधी- विधी व न्याय, कृषी, ग्रामविकास, नगरविकास तसेच महसूल विभागाशी संबंधित आठ महत्त्वपूर्ण निर्णयांना आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामध्ये राज्यात एकूण आठ नवीन न्यायालये स्थापन करणे त्याचसोबत नांदेडसह पाच जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (एससी/एसटी कायदा) दाखल प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी अनन्य विशेष न्यायालये स्थापन करण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मादक द्रव्ये व मादक पदार्थ अधिनियम (एनडीपीएस) अंतर्गत दाखल होणाऱ्या प्रकरणांच्या सुनावणीसाठी पुणे येथे विशेष न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी दिली. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, तर सोलापूर जिल्ह्यातील कुर्डुवाडी येथे दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यासही हिरवा कँदील देण्यात आला. या न्यायालयांसाठी आवश्यक पदनिर्मितीलाही मंजुरी देण्यात आली आहे.याशिवाय अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत दाखल प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी अहिल्यानगर, परभणी, सोलापूर, नांदेड आणि यवतमाळ येथे अनन्य विशेष न्यायालये सुरू करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे प्रलंबित प्रकरणांच्या सुनावणीला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.कृषी विभागांतर्गत 'महाॲग्री-एआय' धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व ॲग्रिटेक नाविन्यता केंद्रातील व्यवस्थापकीय पान ४ वर

# परभणी-मुदखेड रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी १६३ कोटी मंजुर

## 'वंदे भारत'सह मालवाहतुकीलाही मिळणार गती

नांदेड/प्रतिनिधी-भारतीय रेल्वेने दक्षिण-मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील परभणी-मुदखेड दुहेरी रेल्वे मार्गाच्या आधुनिकीकरणासाठी महत्त्वाचा निर्णय घेताना १६३ कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाअंतर्गत मार्गावरील विद्यमान इलेक्ट्रीक ट्रॅक्शन (विद्युत पुरवठा) प्रणालीचे संपूर्ण आधुनिकीकरण करण्यात येणार असून, त्यामुळे या मार्गावरील प्रवासी तसेच मालवाहतूक रेल्वेची क्षमता आणि गती दोन्हीमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. विशेष म्हणजे, भविष्यात 'वंदे भारत एक्स्प्रेस'सारख्या वेगवान रेल्वेगाड्यांचे अधिक कार्यक्षम संचालन करण्यासाठीही हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

या प्रकल्पांतर्गत सुमारे १६४ ट्रॅक रेल्वे मार्गावर सध्या कार्यरत असलेली १२५ केव्ही इलेक्ट्रिक ट्रॅक्शन प्रणाली



बदलून अत्याधुनिक आणि अधिक क्षमतेची २x२५ केव्ही प्रणाली बसविण्यात येणार आहे. त्याचबरोबर वाढीव वीजभार हाताळण्यासाठी आवश्यक असलेल्या वीज पुरवठा यंत्रणा, उपकेंद्रे आणि संबंधित पायाभूत सुविधांचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. यामुळे रेल्वेगाड्यांना अधिक स्थिर आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध होईल, तसेच रेल्वे वाहतुकीतील अडथळे कमी होण्यास मदत होईल. परभणी-मुदखेड रेल्वे मार्ग हा भारतीय रेल्वेच्या 'हायली युटिलाइज्ड नेटवर्क' (एचयूएन रूट-९) मधील अत्यंत महत्त्वाचा दुवा मानला जातो. हा मार्ग अजमेर, इंदूर, खंडवा, अकोला, पूर्णा, मुदखेड, सिकंदराबाद, मेहबूबनगर आणि धोन यांसारख्या प्रमुख शहरांना आणि औद्योगिक क्षेत्रांना जोडतो. त्यामुळे या मार्गावरील क्षमतावाढीचा थेट लाभ प्रवासी वाहतूक, उद्योग आणि व्यापार क्षेत्रालाही होणार आहे. या आधुनिकीकरणामुळे उच्च वेगाच्या रेल्वेगाड्या अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धतीने धावू शकतील. तसेच मालवाहतूक रेल्वेची वाहनक्षमताही वाढणार असल्याने भारतीय रेल्वेने २०२९-३० पर्यंत ३,००० दशलक्ष टन मालवाहतुकीचे निर्धारित केलेले उद्दिष्ट गाठण्यास मोठी मदत होणार आहे. वाढत्या रेल्वे वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांची क्षमता वाढविण्यासाठी आणि आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधा उभारण्यासाठी हा प्रकल्प एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# शब्दांमधून उलगडलेले ग्रामीण जीवन:बहिणाबाईंच्या कवितांचा अविस्मरणीय काव्योत्सव




नांदेड : काही कार्यक्रम केवळ औपचारिकता म्हणून आयोजित केले जात नाहीत, तर ते मनाला समृद्ध करणारा सांस्कृतिक अनुभव देतात. नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ.प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सायन्स कॉलेज, नांदेडच्या सांस्कृतिक विभागाने आयोजित केलेला बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचा काव्यवाचन कार्यक्रम हा अशाच दर्जेदार आणि संस्मरणीय कार्यक्रमांपैकी एक ठरला.



कार्यक्रमाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे सादरीकरणातील नैसर्गिकता. बहिणाबाईंच्या कवितांमध्ये दडलेले ग्रामीण जीवन, निसर्ग, कष्टकरी माणसांचे भावविश्व आणि जीवन तत्त्वज्ञान हे केवळ शब्दांमधून नव्हे, तर प्रभावी अभिव्यक्तीतून उलगडले. डॉ. विभाती कुलकर्णी, डॉ. संगीता मोदी, डॉ. अरुणा शुक्ला आणि राहुल भगत यांनी कवितांचे केलेले भावपूर्ण वाचन प्रत्येक श्रोत्याच्या मनापर्यंत पोहोचले. या कार्यक्रमाचा आत्मा ठरल्या स्नेहा गायकवाड. अभिनयाच्या माध्यमातून त्यांनी बहिणाबाईंच्या कवितांतील व्यक्तिरेखा, भावना आणि प्रसंग इतक्या प्रभावीपणे साकारले की, कविता ऐकण्याबरोबरच त्या प्रत्यक्ष डोळ्यांसमोर घडत असल्याची अनुभूती मिळाली. त्यांच्या अभिनयामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. काव्यवाचन आणि अभिनय यांचा सुंदर मिलाफ हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला.

प्रास्ताविकातून प्रा. लक्ष्मण शिंदे यांनी बहिणाबाईंच्या साहित्याची ओळख करून देत कार्यक्रमाची दिशा निश्चित केली. डॉ. प्रिता बोरकर आणि डॉ. रेखा वाडेकर यांनी केलेले नियोजन कार्यक्रमाच्या प्रत्येक टप्प्यात जाणवत होते. कु जान्हवी गव्हाणे यांनी अत्यंत ओघवत्या आणि नेटक्या शैलीत सूत्रसंचालन केले,तर प्रा.एकनाथ खिल्लारे यांनी आभारप्रदर्शनातून कार्यक्रमाची सांगता केली. सभागृहात उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि साहित्यप्रेमी यांचा उत्स्फूर्त सहभाग हा कार्यक्रमाच्या यशाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू होता. प्रत्येक कवितेनंतर मिळणारी दाद आणि कार्यक्रमभर टिकून राहिलेली शांत, एकाग्र वातावरणाची अनुभूती हेच या उपक्रमाचे खरे यश म्हणावे लागेल.

आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगात ग्रामीण साहित्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम अशा कार्यक्रमांमुळे प्रभावीपणे होत आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांतील लोकजीवनाचा गंध, मातीतली संवेदना आणि जीवनाकडे पाहण्याची सहज दृष्टी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हा कार्यक्रम केवळ एक सांस्कृतिक उपक्रम न राहता, मराठी साहित्य, ग्रामीण संस्कृती आणि बहिणाबाईंच्या अजरामर काव्याचा उत्सव ठरला. साहित्याची अभिरुची जपणारे आणि संस्कृतीची जाण वाढविणारे असे उपक्रम भविष्यातही सातत्याने होत राहावेत, हीच या कार्यक्रमानंतर प्रत्येक रसिकाच्या मनात उमटलेली अपेक्षा आहे.

# विद्यार्थी आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्या

## मुख्यमंत्री फडणवीसांचे गृहविभागाला आदेश

मुंबई/प्रतिनिधी-नीट परीक्षा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात विविध ठिकाणी झालेल्या विद्यार्थी आंदोलनांदरम्यान दाखल करण्यात आलेले किरकोळ गुन्हे मागे घेण्याच्या हालचालींना वेग आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत गृह विभागाला आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या निर्णयामुळे आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.



देशभरात विद्यार्थी आंदोलन तीव्र होत असताना मुंबईतील दादर येथील शिवाजी पार्क परिसरात हजारो विद्यार्थ्यांनी सलग चार दिवस आंदोलन केले होते. विद्यार्थ्यांवरील कथित लाठीमाराचा निषेध करत सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या काळात काही ठिकाणी आंदोलक आणि पोलिसांमध्ये शाब्दिक चकमक झाली होती. काही विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन नोटिसा बजावल्या, तर काहींविरुद्ध किरकोळ स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते.


# लोकशाहीतही जनरल डायर

**लोकशाहीत सरकारची खरी ताकद विरोधकांना दडपण्यात नसते, तर विरोधाचे स्वर ऐकून घेण्यात असते. नागरिकांना शांततेने आंदोलन करण्याचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेने दिलेला मूलभूत अधिकार आहे. परंतु गेल्या महिनाभरात नीट परीक्षा आणि कथित पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे पाहिले, तर हा अधिकार प्रत्यक्षात किती सुरक्षित आहे, असा प्रश्न पडतो. सुरुवातीला विद्यार्थ्यांचे आंदोलन पूर्णपणे शांततेच्या मार्गाने सुरू होते. जगप्रसिद्ध संशोधक आणि समाजसेवक सोनम वांगचुक यांनीही विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना नैतिक पाठिंबा देत आमरण उपोषण सुरू केले. मात्र आंदोलनाच्या विसाव्या दिवशी दिल्ली पोलिसांनी त्यांना जबरदस्तीने उपोषणस्थळावरून हटविल्याचा प्रकार घडला. या घटनेने देशभरातील विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्या. शांततापूर्ण आंदोलनालाही सरकार दडपशाहीने उत्तर देत आहे, अशी भावना निर्माण झाली आणि त्यानंतर आंदोलन अधिक तीव्र झाले.२० जुलै रोजी संसदेकडे निघालेल्या मोर्चा दरम्यान आंदोलकांवर लाठीमार करण्यात आल्याचे, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींशी अमानुष वर्तन झाल्याचे तसेच गर्दी पांगवण्यासाठी पॅलेट गनचा वापर झाल्याचे गंभीर आरोप समोर आले. याच काळात बिहारमध्ये आंदोलकांवर एके-४७ मधून गोळीबार झाल्याच्याही घटना समोर आल्या. या घटनांमागील वस्तुस्थिती अधिकृत चौकशीत स्पष्ट होईल; परंतु अशा आरोपांनीच लोकशाहीच्या आरोग्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास आठवला की जनरल डायर हे नाव क्रौर्याचे प्रतीक म्हणून समोर येते. जालियनवाला बागेत निःशस्त्र नागरिकांवर झालेला गोळीबार आणि त्यानंतरची दडपशाही भारतीय जनमानस कधीच विसरू शकणार नाही. स्वातंत्र्यानंतरच्या भारतात अशी मानसिकता पुन्हा दिसता कामा नये. परंतु आंदोलकांना गुन्हेगारांप्रमाणे वागविण्याची प्रवृत्ती वाढत असेल, तर तो चिंतेचा विषय आहे. आंदोलनादरम्यान सिव्हिल ड्रेसमधील, नावाची पाटी नसलेले, हातात दंडुके घेऊन आंदोलकांना मारहाण करणारे कर्मचारी दिसल्याच्या तक्रारीही समोर आल्या. कायद्याचे रक्षण करणाऱ्यांची ओळखच लपविली जात असेल, तर उत्तरदायित्व कोणाचे ठरणार? लोकशाहीत कायदा अंमलबजावणी करणारी प्रत्येक यंत्रणा पारदर्शक आणि जबाबदार असली पाहिजे. अन्यथा सत्तेचा दंडुका आणि कायद्याची अंमलबजावणी यातील फरकच मिटून जाईल. गेल्या आठवडाभरात विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे संसदेचे कामकाज ठप्प राहिले. आंदोलन संपले, शिक्षणमंत्र्यांचा राजीनामाही झाला; परंतु आंदोलनकर्त्यांवर झालेल्या कथित बळाच्या वापराचा मुद्दा संसदेत कायम राहिला. यावरून हा प्रश्न केवळ एका आंदोलनाचा नसून लोकशाहीच्या मूल्यांचा असल्याचे स्पष्ट होते. आंदोलन करणारे विद्यार्थी देशाचे शत्रू नसतात. ते या देशाचे भविष्य असतात. त्यांच्या हातात पुस्तके असावीत, त्यांच्या अंगावर लाठ्या किंवा गोळ्या नव्हेत. सरकारने कायदा-सुव्यवस्था राखणे आवश्यक आहे; पण त्यासाठी बळाचा वापर हा शेवटचा पर्याय असला पाहिजे, पहिला नव्हे. आज गरज आहे ती अशा सर्व घटनांची निष्पक्ष चौकशी करण्याची, दोषींवर कठोर कारवाई करण्याची आणि सुरक्षा यंत्रणांना लोकशाही मूल्यांची पुन्हा जाणीव करून देण्याची. अन्यथा प्रत्येक आंदोलनात एखादा नवीन ''जनरल डायर'' जन्माला येत राहील आणि लोकशाहीचा आत्माच जखमी होत राहील. स्वातंत्र्यासाठी ज्यांनी बलिदान दिले, त्यांच्या स्मृतीला हा सर्वात मोठा अपमान ठरेल.**

### विकासाचा ध्यास,विद्यार्थी हिताची बांधिलकी आणि संवेदनशील अष्टपैलू नेतृत्व

# आदरणीय सीए डॉ.प्रवीण सदाशिवराव पाटील

## (अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड)



**दयानंद दत्ता तिडके**
पीपल्स कॉलेज,नांदेड

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदाला एक वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे महानायक स्वामी रामानंद तीर्थ, पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ आणि आमचे आधारस्तंभ, माजी खासदार व ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. व्यंकटेश काब्दे यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांनी या संस्थेचे नेतृत्व केले. त्या समृद्ध परंपरेचा वारसा आज समर्थपणे पुढे नेणारे, ज्येष्ठ समाजवादी नेते सदाशिवराव पाटील यांच्या विचारांचा वारसा लाभलेले आदरणीय सीए डॉ. प्रवीण सदाशिवराव पाटील हे नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आहेत.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी माझ्या मनात असलेल्या भावना व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

मी लेखक किंवा विचारवंत नाही. पीपल्स कॉलेजमध्ये कर्मचारी म्हणून कार्यरत असल्यामुळे हे लिखाण साहित्यिक दृष्ट्या परिपूर्ण असेलच असे नाही. व अष्टपैलू व्यक्तिमत्व असणाऱ्या नांदेड मधील नामकीत सीए,उद्धङ विषयाचे विद्यार्थी प्रिय प्राध्यापक अनेकांचे गुरू ह्या त्यांच्या क्षेत्राविषयी न लिहिता महाविद्यालयातील विविध कार्यक्रम, विद्यार्थ्यांशी त्यांचा संवाद आणि संस्थेच्या विविध उपक्रमांमधून साहेबांना जवळून पाहण्याची संधी मला वारंवार मिळते. त्या अनुभवांतून मनात साठलेल्या भावना शब्दबद्ध करण्याचा हा प्रयत्न आहे. माझ्या लिखाणात काही त्रुटी राहिल्या असतील, तर त्या समजून घ्याव्यात, ही नम्र विनंती.

साहेबांना मी प्राथमिक शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना पाहिले आहे. विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेणे, त्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक प्रगतीसाठी आवश्यक मार्गदर्शन करणे आणि महाविद्यालय तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहे हा विश्वास त्यांच्या मनात निर्माण करणे, हे त्यांच्या संवादाचे वैशिष्ट्य आहे. विद्यार्थ्यांशी बोलताना ते स्वतःचे उदाहरण देत सांगतात, मीदेखील याच संस्थेचा विद्यार्थी होतो. एक विद्यार्थी ते संस्थेचा अध्यक्ष हा माझा प्रवास तुमच्यासमोर आहे. त्यामुळे या संस्थेच्या परंपरेवर विश्वास ठेवून, महाविद्यालयाचा अभिमान बाळगा आणि येथे मिळणाऱ्या प्रत्येक संधीचा लाभ घ्या. हा संदेश विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि प्रेरणा निर्माण करणारा ठरतो.संस्थेची मूल्यनिष्ठ परंपरा, भारतीय संविधानातील मूल्ये, मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व, वसतिगृह, अभ्यासिका आणि ग्रंथालय यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. जात, धर्म, पंथ यांच्या पलीकडे जाऊन माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे हा साने गुरुजींचा विचार ते प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवतात. त्यामुळे त्यांची कार्यशैली विद्यार्थ्यांच्या मनाला सहज स्पर्शून जाते.

प्रत्येक क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान, व्यापक दृष्टी आणि विद्यार्थ्यांशी सहज संवाद साधण्याची त्यांची शैली प्रेरणादायी आहे. ते केवळ व्यासपीठावर भाषण करत नाहीत, तर वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधतात. विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्न निर्माण करतात, त्यांना विचार करण्यास प्रवृत्त करतात आणि त्यांच्या प्रश्नांची त्यांना समजतील असे उत्तरे देतात. त्याचबरोबर आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून शिक्षण घ्यावे, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मेहनत घ्यावी आणि स्वतःच्या स्वप्नांना योग्य दिशा द्यावी, मार्गदर्शनही ते करतात.त्यांच्या पुढाकारातून सायन्स महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण स्पेशल बॅच सुरू करण्यात आली असून, माफक शुल्कात दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले जात आहे. पीपल्स हायस्कूलमधील गरजू विद्यार्थ्यांना गणवेश, शालेय साहित्य आणि इतर आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विविध माध्यमातून संस्थेला देणग्या मिळवण्यासाठी त्यांची सातत्यपूर्ण धडपड दिसून येते.

साहेबांनी सुरू केलेली पळसपान ही संकल्पना नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या परिवाराला एका वेगळ्याच नात्यात बांधणारी ठरली आहे. पीपल्स कॉलेज, सायन्स कॉलेज, पीपल्स हायस्कूल तसेच संस्थेतील सर्व सदस्य, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांद्वारे एकत्र आणण्याचे मोठे कार्य या उपक्रमातून झाले आहे. दर्पण आठवणीची साठवण ठरत आहे उत्कृष्ट शिक्षक आणि कर्मचारी पारितोषिक प्रोत्साहन देणारे ठरले आहे तसेच क्रिकेट असो किंवा इतर कोणताही खेळ, साहेब स्वतः सर्वांसोबत मैदानात उतरतात. कधी खेळताना तर कधी एखाद्या लहान मुलाप्रमाणे मनमोकळेपणाने नाचताना त्यांना पाहिले की, पदापेक्षा माणुसकी मोठी असते याची जाणीव होते.त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांचा साधेपणा. सांस्कृतिक कार्यक्रम असो किंवा कोणताही समारंभ; विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी किंवा महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावरील सुरक्षा रक्षकप्रत्येकाशी ते आत्मीयतेने संवाद साधतात. त्यांच्या कुटुंबाची चौकशी करतात आणि अडचण असल्यास संस्था योग्य ती मदत करेल, असा विश्वास देतात. कोणालाही त्यांच्यासोबत छायाचित्र काढायचे असल्यास ते अत्यंत आपुलकीने त्यांची इच्छा पूर्ण करतात. त्यामुळे प्रत्येकाला ते आपलेच वाटतात.

संस्थेच्या विकासासाठी साहेब सातत्याने नाविन्यपूर्ण संकल्पना राबवत आहेत. प्रत्येक विकासकामात स्वतः लक्ष घालून कमीत कमी खर्चात उत्कृष्ट दर्जाचे काम कसे करता येईल, यासाठी ते प्रयत्नशील असतात. सायन्स कॉलेजचे आधुनिक सभागृह, पीपल्स कॉलेजचे नूतनीकरण झालेले कार्यालय, संस्थेच्या कमानी पासून ते पेअर्स ने तयार करण्यात आलेला रस्ता ,अत्याधुनिक क्रीडा संकुल तसेच उभारणी सुरू असलेले भव्य क्रिकेट मैदान आणि जिम ही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देणारी कामे आहेत. व होत आहेत क्रिकेट मैदानाच्या उभारणीदरम्यान स्वतः ट्रॅक्टर चालवून त्यांनी दिलेला सहभाग त्यांच्या साधेपणाचा प्रेरणादायी आहे.संस्थेच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची शैली प्रत्येकाच्या मताला महत्त्व देत विचारविनिमयातून निर्णय घेण्याची त्यांची कार्यपद्धती सर्वांना भावते. कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) सारख्या आधुनिक विषयांवर व्याख्याने आयोजित करून शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना नव्या युगातील ज्ञानाची ओळख करून देण्याचा त्यांचा प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहे.

विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळवू नये, तर शिक्षणासोबत कौशल्य आत्मसात करून स्वावलंबी व्हावे, हा त्यांचा सातत्यपूर्ण आग्रह असतो. आजच्या डिजिटल युगात मोबाईलच्या माध्यमातूनही व्यवसाय करता येतो, रिल्स तयार करूनही उत्पन्न मिळवता येते. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा, असा त्यांचा संदेश विद्यार्थ्यांना नवी दिशा देणारा आहे. याच विचारातून सायन्स कॉलेज आणि जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणासोबत व्यवसाय शिक्षण आणि खखडउ स्टार्टअप सेल हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. तसेच शेती आणि ग्रामीण भागाचे महत्त्वही ते विद्यार्थ्यांना पटवून देत असतात.एनसीसी, एनएसएस, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, वाचन संस्कृती, संशोधन, स्पर्धा परीक्षा आणि व्यक्तिमत्त्व विकास अशा प्रत्येक क्षेत्रात विद्यार्थ्यांना सर्वोत्तम संधी मिळाव्यात, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात नियमित येण्याची प्रेरणा मिळावी म्हणून त्यांच्या संकल्पनेतून दोन्ही महाविद्यालयांमध्ये बांबूपासून आकर्षक कुटी उभारण्यात आल्या आहेत. पीपल्स कॉलेजमध्ये सेल्फी पॉईंट आणि संवाद कट्टा उभारण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयाविषयी आत्मीयता निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना स्वतःच्या पुढाकारातून रोख पारितोषिके देऊन त्यांचा उत्साह वाढवण्याचे कार्यही ते सातत्याने करतात.

सीए डॉ. प्रवीण सदाशिवराव पाटील हे केवळ एका शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष नाहीत; तर विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारे मार्गदर्शक, प्रत्येक कर्मचाऱ्याला आपले मानणारे संवेदनशील नेतृत्व, नावीन्याचा ध्यास घेतलेले दूरदर्शी प्रशासक आणि नांदेड एज्युकेशन सोसायटीला नवीन उंचीवर नेण्याचे स्वप्न कृतीत उतरवणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. यांच्या विषयी लिहण्यासारख भरपूर आहे पण सध्या थांबतो या कार्यात त्यांना संस्थेचे उपाध्यक्ष ड. प्रफुल अग्रवाल,अनुभवी सचिव प्रा. श्यामलताई पत्की (कुंदकर), सहसचिव ड. प्रदीप अनंतराव नागापूरकर, सर्व कार्यकारिणी सदस्य, संस्थेचे सदस्य, माजी विद्यार्थी, प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

आदरणीय साहेबांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड ऊर्जा आणि निरंतर यश लाभो. आपल्या दूरदर्शी नेतृत्वाखाली नांदेड एज्युकेशन सोसायटी अशीच प्रगतीची नवी शिखरे सर करत राहो, हीच प्रार्थना.

# न्यायालयाने भुमिका जशास तशी घ्यावी

**अंकुश शिंगाडे**
नागपूर.

गुन्हे हे घडणारच. जरी संविधान असलं तरी. त्याचं कारण आहे, संविधानाची अंमलबजावणी व्यवस्थीत न होणं. आज संविधान आहे, परंतु गुन्हे घडल्यास त्या गुन्हेगारावर आरोप सिद्ध करीत असतांना न्यायालयात तारीखवर तारीख खटला चालत असतो. गुन्हा करणारा व्यक्ती मरणही पावतो. परंतु तारीख चालत असते. याच दृष्टीकोनातून गुन्हे घडतात व त्यांची संख्या वाढते. तसंच पेपर लीकचं प्रकरण. यापुढेही पेपर लीक होणारच. जरी धर्मेश प्रधानचा राजीनामा झाला तरी. तसेच गुन्हे हे घडणारच. जरी सक्षम कायदे असले तरी. जर सक्षम कायदे असतील आणि न्यायालयात गुन्ह्याचा खटला पाहिजे त्या प्रमाणात जलदगतीनं चालत नसेल वा गुन्हेगाराला अभय मिळत असेल वा कोणत्याही किरकोळ गुन्ह्यांवर कडक अशी जशास तशी शिक्षा होत नसेल तर कदाचित गुन्हे हे वाढत जातील. गुन्हे करायला कोणीच घाबरणार नाही. मुख्यत्वे गुन्हे जर घडूच नये, असे जर वाटत असेल तर संविधानानुसार न्यायालयाची भुमिका ही जशास तशी असावी. निश्चितच गुन्हे कमी होतील व हा देश सुरक्षीत होईल नव्हे तर सुरक्षीत राहिल, यात शंका नाही.

हा भारत आहे व या भारतात संविधान लागू आहे. संविधानानुसार कायदे आहेत व कायद्यानुसार सर्वांना दंडही आहे. परंतु तरीही त्या दंडाला कोणीही घाबरत नसावं असं दिसतं. त्याचं कारण काय असावं? ते सांगणं कठीण आहे.घटना अशी की अकोला येथे एका नराधमानं अल्पवयीन मुलीवर जो बलात्कार केला तो. प्रत्यक्षात हा नराधम पोलीसच होता. यावरुन प्रश्नचिन्हं उभं राहातं की ज्यावर आपण विश्वास करतो. तेही घटक असे वात्रट वागायला लागले. याला कारणीभूत काय असावं? सध्या त्यावर विचार होण्याची गरज आहे.दुसरा मुद्दा शिक्षकांचा. शिक्षकांवर भरपूर विश्वास केला जातो. एवढा विश्वास की त्याच्याएवढा दुसरा विश्वास कुणावरच करता येत नाही. पुर्वी असं नव्हतं. इमानदार व विश्वासू शिक्षक होते पुर्वीच्या काळात आणि वागलेही तसे शिक्षक. म्हणूनच शिक्षकांवर तशा स्वरुपाचा विश्वास निर्माण झाला. परंतु अलिकडील काळात हा शिक्षकही भक्षक बनल्याचं चित्र वर्तमानपत्रातून दिसतं. त्याच्यासमोर येणारी लहान लहान मुलं, त्याच्या हैवानियतची शिकार होतात. आता तर शाळेमधील ना शिक्षीकेवर विश्वास ठेवता येत ना शिक्षक नावाच्या पुरुषांवर. अशी शिक्षण क्षेत्राची परिस्थिती झालेली आहे.

तिसरा घटक आहे, न्यायाधीश. न्यायालयावर जनतेचा अगाढ विश्वास. असा विश्वास की कोणावर अन्याय झाल्यास त्याला जर कोणाकडून न्याय मिळत नसेल वा न्यायाची शाश्वती नसेल तर त्याला न्याय हा न्यायालयातून नक्कीच मिळतो, ही भावना. परंतु आता न्यायालयावरही कुणी विश्वास करणार नाही. कारण जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनाबाबत न्यायालयानं त्यांची असलेली भुमिका नाकारली. म्हटलं की न्यायालयाला त्यांच्यावर मारहाण झालेले व्हिडीओ पाहण्यात बिल्कूल वेळ नाही. शिवाय ज्या सर्वोच्च न्यायालयात खुद्द न्यायाधीशांवरच चप्पल भिरकावली जाते आणि तरीही त्याला न्यायालय काही करीत नाही. यावरुन अंदाज येतो की न्यायालय काहीच करीत नाही. जिथं ते न्यायालय खुद्द स्वतः वर अन्याय होत असतांना स्वतःसाठीच काही करु शकत नाही. ि त थ सामान्य जनतेसाठी काय करेल? त्यावर जंतरमंतरवर झालेली मारहाण न्यायालयाच्या माध्यमातून क्षम्य झाली. असंच दिसून आलं.



अलिकडील काळात देशात गुन्ह्यांची संख्या वाढत चाललेली आहे. जो तो घटक गुन्हे करीत आहेत. नेत्यांवरील गुन्ह्यांची संख्या मोजल्यावर ती जरा जास्तच फुगते. जिथं देशावर राज करणारे नेते गुन्हेगार आहेत. तिथं ते सामान्य जनतेच्या गुन्ह्यांवर कसा काय पायबंद लावू शकतील? हा विचित्र प्रश्न आहे. खुद्द सरकारच शाळेतील मुलांना अपशब्द बोलू नका, मारु नका. असं म्हणतं आणि दुसरीकडं तेच सरकार अशा मुलांवर पोलिसांकडून लाठीचार्ज करतं. असं जर घडत असेल व त्यावर न्यायालयही व्हिडीओ पाहायला नकार देत असेल तर खरंच देशात गुन्हेगारी घडणार नाही तर काय? अशा प्रकाराने देशात नक्कीच पेपर लीक होणारच. त्याला रोकणारं कुणीच नाही. जरी आंदोलन झालं व शिक्षणमंत्री महोदयाचा राजीनामा घेतला तरी. कारण यापुर्वीही कित्येक गुन्हेगारांना फाशी झाली. परंतु गुन्हे बंद झाले काय? याचा अर्थ नाही असा येतो.देशात संविधानासारखं धारदार शस्त्र बनलं. ते शस्त्र लागूही केलं आणि त्यानुसार देशही चालतो. त्यातच देशात त्याच संविधानातील शस्त्रानं लोकांना शिक्षाही होते. चोरानं चोरी केल्यास दंड होतो. कैदही होते. परंतु चोरी होत नाही काय? चोरी करणं बंद झालं काय? इथं कित्येकांचे खुन होतात. बलात्कार होतात. परंतु बलात्काराचे प्रमाण कमी झाले काय? असं लोकांचं म्हणण. मग का राजीनामा मागितला. असेही काही लोक म्हणतात. कदाचित त्यात षडयंत्र असू शकते.

सगळं बरोबर आहे व राजीनामा मागणे एक षडयंत्रच. चोरी, खुन, अपघात, मारामारी, डकैती. हे गुन्हे देशात चालणारच. त्यातच पेपर लीकही देशात चालणारच. परंतु राजीनामा मागण्यातून हा संदेश अस्तित्वात आला की निदान या तरी भारत देशात कोणाची मुजोरी खपवून घेतली जाणार नाही. तसंच पेपर लीक करणाऱ्यांना थोडातरी आवर हा घालता तर आला. तसंच जर कोणत्याही गुन्ह्याबाबतीत केलं. तर कदाचित ते गुन्हे वा त्या गुन्ह्याचं प्रमाण नक्कीच कमी होवू शकते. यात शंका नाही. मग कोणताही पोलीस वा कोणताही शिक्षक वा कोणताही देशातील सामान्य नागरीक गुन्हे करतांना दहा वेळेस विचार नक्कीच करेल. परंतु हे कोण करु शकते अर्थात अशा गुन्हे घडण्यावर कोण ब्रेक लावू शकते? याचं उत्तर साहजीकच न्यायालय असं येईल. न्यायालय नक्कीच यावर ब्रेक लावू शकते.

न्यायालय... भारतीय लोकशाहीचा तिसरा आधारस्तंभ नव्हे तर भारतीय लोकशाहीचा आत्माच. अशावेळेस या न्यायालयानं कोणाच्याच इच्छा, आकांक्षा, भावभावना व भुलथापा यावर लक्ष न देता केवळ अन्यायग्रस्त भाग विचारात घेवून कार्य केले तर साहजीकच गुन्ह्यांवर थोडासा ब्रेक नक्कीच लावला जावू शकतो. ज्यात किरकोळ स्वरुपाचे गुन्हे जरी असले, तरी असे गुन्हे थांबवता येवू शकतात. ज्यात किरकोळही गुन्हा असला तरी दंडात्मक व शिक्षात्मक कैदेची जबरदस्त कारवाईची तरतूद असावी. त्यातच कोणी जर न्यायालयाचा अवमान करण्याचा प्रयत्न केल्यास वा चप्पल भिरकविल्यास त्यालाही न्यायालयानं क्षमा न करता कडक शिक्षात्मक व दंडात्मक अशा शिक्षेची कारवाई करावी. जेणेकरुन कोणीच व्यक्ती गुन्हा करणार नाही. गुन्ह्याचा प्रयत्न करणार नाही. त्यातच न्यायालयानं गुन्ह्याबाबत जशास तसे ही जर भुमिका घेतली तर निश्चितच देशात गुन्हे कमी होतील व हा देश आपोआपच सुरक्षीत होईल. सुरक्षीत राहिल, यात शंका नाही. मात्र न्यायालयानं तशी भुमिका घ्यावी. हे महत्वाचं आहे.


**CHANGE IN MY NAME**

My Old Name IS:- Pyar Mohammed Shaikh

NEW Name IS:- Pyar Mohammed Shaikh Jan Mohammed Shaikh

Henceforth my all correspondence with Be done as per my new name. Please Consider the same.

-:Contract:-

Address:- Plot No.10 Sameera Bag, Waghi Road Post Vazirabad,
District: Nanded
State: Maharashtra.
PIN Code: 431601

Contact no:-9890616544



सायंदैनिक नांदेड वार्ता

* संपर्क कार्यालय *

व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१

**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,

**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८

E-mail: nandedwarta@mail.com

## रेशीम उद्योगाला चालना की,केवळ कागदोपत्री कार्यक्रम?
# वीजअभावी प्रधानसांगवीसह अनेक ठिकाणचे रेशीम उद्योग बंद





किनवट/प्रतिनिधी-रेशीम उद्योग हा शेतीशी निगडित व्यवसाय असून त्यातून सुद्धा रोजगार उपलब्ध होऊ शकतो. या दृष्टिकोनातून रेशीम उद्योग संचालनालय नागपूर आणि किनवट कृषी विभागाच्या वतीने बोधडी खुर्द येथील शेतकऱ्यांसाठी नुकताच प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. शेतकऱ्यांनीही आवर्जून उपस्थिती लावली होती. प्रधानसांगवीसह अनेक ठिकाणचे रेशीम उद्योग बंद पडलीत. चोवीस तास वीज पुरवठा होत असेल तरच रेशीम उद्योग शेतकऱ्यांच्या हितावह ठरु शकतो, अशी प्रतिक्रिया प्रधानसांगवीतील रेशीम उद्योग शेतकरी पांडुरंग गंगाराम केंद्रे यांनी नांदेड वार्ताशी बोलताना सांगितले.

किनवट तालुक्यातील रेशीम उद्योग शेतकऱ्यांची रोडावलेली संख्या पाहता याकडे ना कृषी विभागाचे लक्ष नाही, ना रेशीम उद्योग संचालनालय प्रशासनाला त्याची चिंता. रेशीम उद्योग हा किमान किनवट तालुक्यातील स्थिती पाहता केवळ कागदोपत्रीय कार्यक्रमापुरता सिमीत ठेवल्याचे पहायला मिळते. पाच वर्षांपूर्वी प्रधानसांगवीसह काही गावात कृषी आणि रेशीम विभागाने गाजावाजा करून तुतीची लागवड करून रेशीम उद्योगाला चालना दिली परंतु कोसला तयार करणाऱ्या आळ्यांना जीवंत ठेवण्यासाठी चोवीस तास वीज पुरवठ्याची गरज असते असे पांडुरंग केंद्रेंनी सांगितले. रेशीम कोसल्याचा एक एक तोडा एक ते दीड क्विंटलचा असायचा, कसेबसे मार्केट मिळायचे मात्र भाव कमी अधिक मिळायचा. आळ्यांना पुरक प्रमाणात तुतीचे खाद्य पाहिजे. तुतींची बाग जीवंत ठेवण्यासाठी मुबलक प्रमाणात पाणी पाहिजे. आळ्यांच्या शेडला उन्हाळ्यात थंड वातावरण असेल तरच आळ्या सुरक्षित राहतात. त्यासाठी बारमाही चोवीस तास वीज पुरवठा अत्यंत गरजेचा ठरतो असेही पांडुरंग केंद्रेंनी सांगितले. कृषी आणि रेशीम विभागाने अशा तांत्रिक समस्यांबद्दल शेतकऱ्यांना हमी द्यायला हवी. पुरक प्रमाणावर ही संसाधने उपलब्ध असती तर प्रधानसांगवीसह अनेक गावांतील शेतकऱ्यांकडे रेशीम उद्योग प्रकल्प जीवंत राहिली असती असे अनेक शेतकऱ्यांकडून ऐकायला मिळाले.

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीत विजयसिंह देशमुख यांचा तीन मतांनी विजय

देगलूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या देगलूर मतदारसंघातील प्रतिष्ठेच्या निवडणुकीत भाजपाचे उमेदवार विजयसिंह देशमुख यांनी काँग्रेसच्या उमेदवार सौ.श्वेता पाटील यांचा अवघ्या तीन मतांच्या फरकाने पराभव करत विजय मिळविला. मात्र या निकालानंतर संपूर्ण तालुक्यात सर्वाधिक चर्चा रंगली ती राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक नेते तथा देगलूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष ॲड.अंकुश देसाई देगावकर यांच्या राजकीय रणनीतीची. भाजपाचा गड राखण्यात त्यांच्या खेळीने निर्णायक भूमिका बजावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

ही निवडणूक वरकरणी भाजप आणि काँग्रेस यांच्यात झाली असली तरी प्रत्यक्षात ती शिवाजी देशमुख बळेगावकर विरुद्ध ॲड. अंकुश देसाई देगावकर यांच्यातील प्रतिष्ठेची राजकीय लढत ठरल्याचे बोलले जात आहे. भाजपाचे पदाधिकारी असूनही शिवाजी देशमुख बळेगावकर यांनी काँग्रेसच्या उमेदवाराच्या विजयासाठी सक्रिय प्रयत्न केल्याची चर्चा निवडणुकी दरम्यान होती. त्यामुळे भाजपसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. अशा परिस्थितीत ॲड. अंकुश देसाई देगावकर यांनी पडद्यामागून मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवत विविध स्तरांवर समन्वय साधत आणि शेवटच्या क्षणापर्यंत प्रभावी मोर्चेबांधणी करत भाजपाच्या उमेदवाराची खिंड लढवली आहे. विशेषतः खानापूर व करडखेड भागातील राजकीय संपर्क आणि मतांची जुळवाजुळव निर्णायक ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. निकाल केवळ तीन मतांवर ठरल्याने प्रत्येक मत अमूल्य ठरले. त्यामुळे हा विजय सहज मिळालेला नसून पडद्यामागील रणनीती, संघटन कौशल्य आणि राजकीय नियोजन यांची मोठी कसोटी ठरली आहे. किंबहुना प्रतिकूल राजकीय वातावरणातही भाजपाचा गड अबाधित राखण्यात ॲड. अंकुश देसाई देगावकर यांची भूमिका महत्त्वाची ठरली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या या निकालामुळे देगलूर तालुक्यातील आगामी राजकीय समीकरणांनाही नवी दिशा मिळाल्याची चर्चा सुरू झाली आहे. अवघ्या तीन मतांनी ठरलेला हा निकाल आणि त्यामागील राजकीय डावपेच येत्या काळातही चर्चेचा विषय राहणार हे वास्तव आहे.




नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत नांदेड अ मतदारसंघातून संगिता विठ्ठल पाटील ह्या विजयी झाल्या आहेत. कार्यकर्त्यांनी त्यांचा पुष्पहार घालून व गुलाल उधळून जल्लोष साजरा केला.

# धर्माबादमध्ये दत्तू रेड्डींचा एकतर्फी विजय;३१ पैकी मिळवली २७ मते

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक

धर्माबाद/प्रतिनिधी-जिल्ह्याचे लक्ष लागून असलेल्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक मंडळाच्या सार्वत्रिक निवडणुकीत धर्माबाद तालुका 'अ' वर्ग मतदारसंघातून मराठवाडा जनहित पार्टीचे उमेदवार दत्तू लक्ष्मणराव रेड्डी यांनी ऐतिहासिक आणि दणदणीत विजय मिळवला आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या निवडणुकीत दत्तू रेड्डी यांनी प्रतिस्पर्ध्यांचा धुव्वा उडवत एकूण ३१ वैध मतांपैकी तब्बल २७ मते आपल्या पारड्यात पाडून घेतली.

जिल्हा बँकेच्या एकूण २३ जागांपैकी ११ जागा आधीच बिनविरोध झाल्या होत्या. उर्वरित १२ जागांसाठी रविवारी ९५ टक्क्यांपेक्षा जास्त विक्रमी मतदान झाले होते. धर्माबाद तालुक्यात १०० टक्के मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान केले होते. मंगळवारी झालेल्या मतमोजणीत सुरुवातीपासूनच दत्तू रेड्डी यांना ३१ पैकी अखेर २७ मतांसह विजयावर शिक्कामोर्तब केले. सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली लढवल्या गेलेल्या या निवडणुकीतील विजयामुळे शेतकरी विकास पॅनेलने धर्माबादमध्ये आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. दत्तू लक्ष्मणराव रेड्डी यांच्या दणदणीत विजयाची घोषणा होताच धर्माबाद आणि नांदेड परिसरातील मराठवाडा जनहित पार्टीचे अध्यक्ष तथा नगर परिषद धर्माबाद उपाध्यक्ष महेश ऊर्फ शंकर बोल्लमवाड, मोहिज शेठ करखेलीकर गटनेते ताहेर पठाण त्यांच्यासह कार्यकर्त्यांनी व समर्थकांनी गुलालाची उधळण करत आणि फटाक्यांची आतिषबाजी करत मोठा जल्लोष साजरा केला. सहकार क्षेत्रातील शेतकरी आणि संस्थांच्या हितासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही विजयी उमेदवार दत्तू रेड्डी यांनी यावेळी दिली.



# कंधारच्या रामरहीमनगरमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव

## नगराध्यक्षांकडे विकास कामे करण्याची मागणी

कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील शासकीय वसाहत असलेल्या रामरहिम नगरमध्ये मूलभूत सुविधांचा पूर्णपणे अभाव जाणवत आहे.गेल्या अनेक वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या नाल्या आणि रस्त्यांची कामे पूर्णपणे जीर्ण झाल्याने येथील रहिवाशांना दैनंदिन जीवनात मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.त्यामुळे या वसाहतीतील रस्ते,नाल्या व स्ट्रीट लाईटची कामे तात्काळ करावीत. अशी मागणी समस्त रामरहिम नगर वासियांच्या वतीने कंधार नगरपरिषदेचे नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



वसाहतीतील नाल्या ठिकठिकाणी तुटल्याने सांडपाणी रस्त्यावर साचून राहत आहे.त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.परिणामी लहान मुले, वृद्ध आणि नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे.याचबरोबर वसाहतीतील सर्वच अंतर्गत रस्ते निकामी झाले आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे रात्रीच्या वेळी जाधव हॉस्पिटल ते शेख जिलानी यांच्या घरापर्यंत मुख्य रस्त्यावर स्ट्रीट लाईट नसल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच महिलांना व विद्यार्थ्यांना भितीच्या सावटातून जावे लागत आहे.त्यामुळे वसाहतीतील सर्वच जुन्या नाल्या व रस्त्यांचे नव्याने सी.सी. बांधकाम करावे. तसेच जाधव हॉस्पिटल ते शेख जिलानी यांच्या घरापर्यंत मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूने स्ट्रीट लाईटची व्यवस्था करावी.अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर मकसूद शेख, सुलतान शहा सलीम शहा, गफार शेख,मारुती वाघमारे, सागरबाई एंगडे,तुराब शेख, सुलतान शेख,सुलतान सय्यद, हुसेन शेख,अरुणाबाई गडंबे, पारूबाई कांबळे, चांदू यमुलवाड, मगदूम शेख, पवार नागू, बालाजी रोयलवाड यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनाही देण्यात आल्या आहेत. लवकरात लवकर कामे न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा ही नागरिकांनी दिला आहे.

# सागवान तस्करांवर वनविभागाचा छापा; चिखलीत लपवलेले सागवान लाकूड जप्त

किनवट/प्रतिनिधी-चिखली (बु.) गावालगत लपऊन ठेवलेल्या सागवान लाकडाचा सुगावा लागल्यामुळे किनवट, बोधडी आणि विदर्भातील खरबी वनविभागाने २६ जुलैच्या रात्री संयुक्त धाड घालून ७ हजार ५५४ रुपये किंमतीचे लाकूड हस्तगत करण्यात पथक यशश्वी झाले. उपवनसंरक्षक, सहाय्यक वनसंरक्षक आणि वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल आणि वनरक्षकाच्या पथकाने सदरची कारवाई केलीय. छाप्यात किती किंमतीचे लाकूड मिळाले यापेक्षा तेथे रात्री जाऊन कारवाई करणे हे काम मोठे जिकिरीचे होते, हे उल्लेखनीय म्हणता येईल.



किनवट वनपरिक्षेत्राच्या कार्य कक्षेतील चिखली बु. गावाशेजारी सागवान लाकडाचे मोठे चार (अनगड) नगं लपऊन ठेवल्याची किनवट वनविभागाला मिळाली. त्यावरून नांदेडच्या उपवनसंरक्षक मनीषा पाटील, किनवटचे सहायक वनसंरक्षक किरण चव्हाण, किनवट येथील प्रादेशिकचे वनपरिक्षेत्र अधिकारी धीरज मदने, बोधडीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सी.जी.पोतूलवार आणि फिरत्या पथकचे वनपरिक्षेत्राधिकारी एन.एन.केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक गस्तीपथकातील वनपाल बी.टी.जाधव, मनोज गुरसाळी, वनरक्षक रवी दांडेगावकर, मारोती केंद्रे, बालाजी झंपलवाड. बोधडी वनपरिक्षेत्रातील वनरक्षक अरुण चुक्कलवार तसेच विदर्भातील खरबी वन्यजीव विभागाच्या कर्मचाऱ्यांनी जायमोक्यावर जाऊन कारवाई करण्याचे धाडस दाखवले.२६ जुलैच्या रात्री छापा मारल्यानंतर मोठे चार सागवान नगं ०.३५८ घनमिटर ७ हजार ५५४ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून अज्ञाताविरुद्ध वनगुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. उल्लेखनीय म्हणजे या धाडसाच्या कारवाईदरम्यान तात्काळ मदतीला धावलेले खरबी वन्यजीव विभागाचे कर्मचारी आणि वाहनचालक बाळकृष्ण आवले यांचा या कारवाई दरम्यान अत्यंत महत्वाचा रोल होता.


# उमरी नगर परिषद उमरी ता.उमरी जि.नांदेड

## निविदा/दरपत्रक २०२६

जा.क्र.उनप/२०२६ दिनांक २७/०७/२०२६

## उमरी नगर परिषद वार्षिक निविदा/दरपत्रक सन २०२६-२७

नगर परिषद उमरी जिल्हा नांदेड करीता मुख्याधिकारी नगर परिषद उमरी यांचे कडुन साल सन २०२६-२७ करीता विविध विभागांतर्गत दिनांक २७/०७/२०२६ ते ०४/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत नोटीस बोर्डवर व नगर परिषद संकेतस्थळावर प्रसिध्दी करुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार/पुरवठाधारक यांचेकडून वार्षीक निविदा/दरपत्रक मागवित आहेत.

टिप :- वरील निविदे मध्ये (२१) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहिती खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

https://mahaulb.in/MahaULB/home/ulblist/viewmore

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर परिषद उमरी जि.नांदेड



**CHANGE IN MY NAME**
My Old Name IS:- Javeriya Anjum Pyare Mohammed
NEW Name IS:- Javeriya Anjum
Henceforth my all correspondence with
Be done as per my new name.
Please Consider the same.
-:Contract:-
Address:- Plot No.10 Waghi Road Sameera Bagh Nanded Dist Nanded.431601(M.S)
Contact no:-8999131515



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता**
## सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर
## ई-निवीदा सुचना क्रमांक ०६ सन २०२६-२०२७

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर जिल्हा नांदेड (दुरध्वनी क्रमांक ०२४६३-२५५१११) हे महाराष्ट्र शासनकडील योग्य त्या प्रवर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन नांदेड जिल्ह्यातील एकुण (२०) कामांकरीता ब-१ नमुन्यातील ई-निवीदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

या निवीदे अंतर्गतची संपुर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

टीप-१) निवीदा कागदपत्राचा तपशील महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरिंग संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/nicgep/app आणि www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
२) सदर निवीदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.
३) निवीदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर यांनी राखुन ठेवला आहे.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर
जि.नांदेड

डीजीआयपीआर/आरओसी-२०२६-२७/क्र.-५/सी१९३०


## नदीच्या पात्रात अनोळखी इसमाचे प्रेत सापडले

नांदेड/प्रतिनिधी-हस्सापूर शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रात एका इसमाचे प्रेत आज (मंगळवार) सकाळी आढळून आले आहे.

गोदावरी नदीच्या पात्रात एका इसमाचे प्रेत असल्याची माहिती वजिराबाद पोलीसांना आज सकाळी नागरिकांनी दिली. पोलीसांनी घटनास्थळी धाव घेवून जीवरक्षकाच्या मदतीने प्रेत नदीच्या पात्रातून बाहेर काढले. मयत इसमाचे नाव फारुख अहमद खान (वय ५६) असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन प्रेत शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले आहे.


# आठ दिवस उलटूनही श्रीराम कृषी सेवा केंद्रावर कारवाई नाही

## कालबाह्य कीटकनाशक औषध विकून फसवणूक:महिला शेतकरी न्यायाच्या प्रतीक्षेत

किनवट/प्रतिनिधी-किनवट येथील श्रीराम कृषी सेवा केंद्र चालकांकडून झेंडीगुडा येथील महिला शेतकरी धुरपताबाई गोबरा रबडे यांना कालबाह्य (मुदत संपलेली) कीटकनाशके देऊन फसवणूक केल्याचा आरोप सहाय्यक जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे २० जुलै रोजी केलेल्या तक्रारीत केला आहे. श्रीराम कृषी सेवा केंद्राविरुद्ध तक्रार करुन आठ दिवस झाले तरी कसलीही कारवाई केलेली नाही. या कृषी केंद्राविरुद्ध अधूनमधून तक्रारी असताना सुद्धा प्रशासन कारवाई करण्याचे धाडस करताना दिसत नाही. कारवाई न केल्यास कृषी अधिकाऱ्यांविरुद्ध शेतकरी मैदानात उतरण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

१९ जुलै रोजी किनवट येथील श्रीराम कृषी सेवा केंद्र चालकांकडून मॅकेरिना औषध खरेदी करण्यात आले. नेमके औषधाच्या मुद्दत तारखेवरच गडद शाईने पन्नास मिली असे लिहिल्यामुळे सर्वसामान्य महिला शेतकऱ्यांच्या लक्षात येत नाही. गावातील अनेकांच्या लक्षात आल्यानंतर बारकाईने पाहिले असता मुद्दतबाह्य औषधी असल्याचे खातरजमा झाल्यानंतर महिला शेतकरी धूरपताबाई रबडे यांनी फसवणूक झाल्याची तक्रार केली.सहाय्यक जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे २० जुलै रोजी तक्रार केल्यानंतर एक आठवडा लोटला परंतु कसलीही कारवाई करण्यात आली नसल्याची बाब समोर आली. २८ जुलै रोजी तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड यांच्याशी संपर्क साधून या विषयी काय कारवाई केली हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला मात्र मिटींगमध्ये असल्याचे दस्तुरखुद्द त्यांनीच सांगितले. किमान सहाय्यक जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांनीतरी कृषी विभागाशी संपर्क साधला काय ? हे सुद्धा कळायला मार्ग नाही. मग या महिला शेतकऱ्याने कोणाकडून न्यायाची अपेक्षा करायची ? अशा वादग्रस्त कृषी केंद्र चालकांने यंत्रणा मुठीत ठेऊन शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचे उद्योग चालवल्याचे आरोप करण्यात आले आहेत. तालुका कृषी अधिकारी या महिला शेतकऱ्याला कधी न्याय देणार ? हे पहाणे सुद्धा तेवढेच महत्त्वाचे ठरणार आहे.








# एसआयआर न केल्यास सर्व योजनांचे लाभ बंद होणार-महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई/प्रतिनिधी-विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) प्रक्रियेबाबत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या वक्तव्यामुळे राज्यभरात मोठी चर्चा सुरू झाली आहे. एसआयआर प्रक्रिया पूर्ण न केल्यास मतदारयादीत नाव राहणार नाही आणि त्याचा परिणाम विविध शासकीय योजनांच्या लाभांवर होऊ शकतो, असा इशारा त्यांनी दिला.

एका कार्यक्रमात बोलताना बावनकुळे म्हणाले की, राज्यात विशेष सखोल फेरतपासणी ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत नागरिकांना त्यात सहभागी होण्याची संधी आहे. ही मुदत संपल्यानंतर एसआयआर न केलेल्यांना अडचणींना सामोरे जावे लागू शकते, असे त्यांनी सांगितले.बावनकुळे यांच्या म्हणण्यानुसार, मतदारयादीत नाव नसल्यास नागरिकांना अनेक मूलभूत हक्कांपासून वंचित राहावे लागू शकते. रेशन योजना, महिला व बालकल्याण विभागाच्या योजना, समाजकल्याण विभागाच्या विविध योजना तसेच इतर शासकीय लाभ मिळविताना अडचणी निर्माण होऊ शकतात. भविष्यात आधार आणि मतदार ओळखपत्र यांची सांगड घालण्याची प्रक्रिया होणार असल्याचेही त्यांनी सूचित केले.मतदार नसल्यास अनेक प्रशासकीय प्रक्रियांमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात. पालकांचे नाव मतदारयादीत नसेल तर त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रवेशासह विविध कामांमध्ये अडचणी येऊ शकतात. त्यामुळे प्रत्येकाने एसआयआर प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा 'घर आहे, पण फायदा नाही' अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.दरम्यान, त्यांच्या वक्तव्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. येत्या एक-दोन वर्षांत १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांचे नाव मतदारयादीत कसे समाविष्ट होणार, उच्च शिक्षणासाठी किंवा नोकरीनिमित्त परदेशात असलेल्या नागरिकांना मतदानाचा अधिकार कशा पद्धतीने मिळणार, याबाबत नागरिकांकडून शंका व्यक्त केल्या जात आहेत.

# साहित्यिक रुचिरा बेटकर यांना डॉ.अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार जाहीर



नांदेड/प्रतिनिधी-साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधून सामाजिक, साहित्यिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्य कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी नांदेड येथील साहित्यिक रुचिरा शेषराव बेटकर यांची डॉ. अण्णा भाऊ साठे गौरव पुरस्कार-२०२६ साठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन शनिवार, दि. १ ऑगस्ट रोजी दुपारी साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे चौक, नांदेड येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन लहुजी साळवे युवक संघ, नांदेड आणि साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे जयंती महोत्सव समिती, नांदेड यांच्या वतीने संयुक्तपणे करण्यात आले आहे. रुचिरा बेटकर यांच्या या निवडीबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन केले जात आहे. या सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.


# हदगांव नगर परिषद हदगांव

ता.हदगाव जि.नांदेड
०२४६८ ऑफिस २२२४०८
Email-id-cohadgaon@gmail.com स्थापना १९५४

ह.न.प.जा.क्र./१४३९/२०२६ दिनांक : २७/०७/२०२६

## निविदा सूचना

सर्व अधिकृत साहित्य पुरवठा धारक यांना सुचित करण्यात येते की, हदगांव नगर परिषद कार्यालयास विद्युत विभाग आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभागा करीता साहित्य खरेदी बाबत सालसन २०२६-२७ या आर्थिक वर्षा करीता दर करार करण्या करीता दर पत्रक मागविण्यात येत आहेत. तरी संबंधित साहित्य धारकांनी आपले दरपत्रक ०३.०८.२०२६ या दिनांक पर्यंत नगर परिषद कार्यालयात समक्ष सादर करावेत. मुदती नंतर आलेली कोणतेही दरपत्रक स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत | निविदा अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १. | पाणीपुरवठा विभागात पाईपलाईन दुरुस्ती व आवश्यकतेनुसार लागणारे साहित्य पुरवठा करणे. | ५००/- | २०००/- |
| २. | पाणीपुरवठा विभागात शुद्ध पाणीपुरवठा करण्याकरिता ब्लिचिंग पावडर खरेदी करणे बाबत. | ५००/- | २०००/- |
| ३. | पाणीपुरवठा विभागात शुद्ध पाणीपुरवठा करण्याकरिता तुरटी (alum) खरेदी करणे बाबत. | ५००/- | २०००/- |
| ४. | पाणीपुरवठा विभागात हदगाव शहरात असलेल्या सबमर्सिबल बोरवेल मधील 1 HP, 3HP, 5HP मोटार व स्टार्टर, त्या सोबत लागणारे इतर साहित्याची खरेदी करणे बाबत. | ५००/- | २०००/- |
| ५. | विद्युत विभागात इलेक्ट्रिक साहित्य व लाईट पुरवठा करणे. | ५००/- | २०००/- |
| ६. | कार्यालयातील सर्व विद्युत विषयक दुरुस्ती कामे करणे. | ५००/- | २०००/- |
| ७. | आरोग्य विभागात लागणारे साहित्य पुरवठा करणे. | ५००/- | २०००/- |
| ८. | शहरात नवीन इलेक्ट्रिक pole टाकणे व अडथळा निर्माण करणारे पोल व डी.पी.स्थलांतरित करणे. | ५००/- | २०००/- |
| ९. | शहरातील नादुरुस्त स्ट्रीट लाईटचे दुरुस्ती करणे. | ५००/- | २०००/- |
| १०. | कार्यालयीन कामाकरिता स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे. | ५००/- | २०००/- |
| ११. | कार्यालयीन कामाकरिता संगणक साहित्य पुरवठा करणे. | ५००/- | २०००/- |
| १२. | पाणीपुरवठा विभागात हदगाव शहरात असलेल्या सबमर्सिबल बोरवेल मधील 1 HP, 3HP, 5HP मोटार व स्टार्टर दुरुस्ती. | ५००/- | २०००/- |
| १३. | कोथळा पंप हाउस 100 HP मोटार व स्टार्टर दुरुस्ती. | ५००/- | २०००/- |
| १४. | जलशुद्धीकरण केंद्र येथील 50 HP मोटार व स्टार्टर दुरुस्ती. | ५००/- | २०००/- |

**नियम व अटी :**

१. पुरवठा करण्यात येणारे सर्व साहीत्य हे नामांकित कंपनीचे आय.एस.आय. मार्क व सर्व शासकीय करासहीत दर नमुद करावे.
२. सर्व साहित्याचे पुरवठा हा कार्यालयापर्यंत करावा लागेल.
३. साहित्याचा पुरवठा हा पुरवठा आदेश दिल्या पासून तीन दिवसाचे आत करणे बंधनकारक राहील.
४. कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा सर्व अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
५. सर्व साहित्याची यादी निविदा फॉम सोबत संबधीत विभागामध्ये पहावयास मिळतील.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगरपरिषद हदगाव


# वृक्षलागवडीचा संकल्प; आरोग्य शिबिर, कीर्तन व शैक्षणिक साहित्य वाटपाचे आयोजन




नांदेड /प्रतिनिधी-नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त १ ऑगस्ट रोजी मतदारसंघात विविध सामाजिक व जनहिताचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये ११ हजार वृक्षलागवड, आरोग्य शिबिरे, कीर्तन, व्याख्यान, विविध ठिकाणी महाप्रसाद तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवसेना पक्षप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या '२० टक्के राजकारण, ८० टक्के समाजकारण' या विचारधारेनुसार शिवसेनेचे नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेनेचे उपनेते आमदार हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड दक्षिण मतदारसंघात सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याचे गिरडे यांनी सांगितले. वाढदिवसानिमित्त आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी मतदारसंघातील विविध गावांमध्ये ११ हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प केला असून, पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येणार आहे. शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून लागवड केलेल्या वृक्षांच्या संगोपनाची जबाबदारीही स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले. याशिवाय नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण, आध्यात्मिक व सामाजिक प्रबोधन करणाऱ्या कीर्तनाचे आयोजन तसेच विविध ठिकाणी महाप्रसादाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सर्व समाजोपयोगी उपक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. पत्रकार परिषदेस शहरप्रमुख तुळजेश यादव, दत्तात्रय पईतवार, श्याम पाटील वानखेडे, नरेंद्र गायकवाड, पांडुरंग येवले आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती...

प्रणिता देवरे चिखलीकर, आ.भीमराव केराम, आ.डॉ.तुषार राठोड, आ.प्रताप पाटील चिखलीकर, मिनल पाटील खतगावकर, श्रीनिवास चव्हाण, शिवराम लुटे, कैलाश देशमुख गोरठेकर, सुशिलाबाई हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, पुनम राजेश पवार हे अकरा संचालक बिनविरोध निवडून आले आहेत.

## नांदेडसह ५ जिल्ह्यांत...

संचालक पदाला मान्यता देण्यात आली.ग्रामविकास विभागाच्या प्रस्तावानुसार ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या प्रतिनिधींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश काढण्याचा निर्णय घेण्यात आला.नगरविकास विभागाच्या प्रस्तावानुसार मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या अधिकृत समभाग भांडवलात २५ कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयांपर्यंत वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच कँपनीचे भरणा केलेले समभाग भांडवल २५ कोटी रुपयांवरून २२५ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात येणार आहे.महसूल विभागाच्या निर्णयानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८(७) मध्ये सुधारणा करण्यात येणार असून, गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणांत स्वामित्वधनाच्या दहापट दंडाची तरतूद करण्यात आली आहे.मंत्रिमंडळाच्या या निर्णयांमुळे न्यायव्यवस्थेला बळकटी मिळण्याबरोबरच कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानविषयक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज, मुंबईतील रेल्वे पायाभूत सुविधा आणि अवैध गौण खनिज उत्खननावर नियंत्रण यांना चालना मिळणार असल्याचे मानले जात आहे.


NANDED EDUCATION SOCIETY'S

# SCIENCE COLLEGE, NANDED

(Reaccredited with 'A+' grade by NAAC in 4th cycle, DST-FIST, CPE Status, Best College Award)

## WALK IN INTERVIEW

The following post of Assistant Professor on Clock Hour Basis (CHB) for Granted Courses are to be filled in Senior College on purely temporary basis for the academic year 2026-27 only. The eligible candidates have to attend an interview with original documents on following dates at 10.30 AM in the Office of the Principal Cabin Science College Nanded with their own expenses. The posts on CHB are approved by Joint Director, Higher Education Nanded Region, Nanded vide letter No. ससंउशिनां/घ.ता./अनु–०२/२०२६–२७ JDNAN-NGCoANUN(NND) 386/2026-COURT 1/2499675/2026 dated 07/07/2026. The subjects and number of posts are as follows-

| Sr. No. | Subject | CHB (Granted) | Date of Interview |
|---|---|---|---|
| 1. | Agrochemical & Fertilizers | **01** | **30/07/2026** |
| 2. | Agricultural Microbiology | **01** | **30/07/2026** |

**Educational Qualification:**

i) As per the norms of UGC, Govt. of Maharashtra and S.R.T.M. University, Nanded with good academic record.
ii) M.Sc./M.E./M.Tech./M.A. and NET/SET/Ph.D. for CHB post.
iii) Remuneration for CHB post will be paid subject to the approval of University and Joint Director, Higher Education, Nanded Region, Nanded.
iv) Documents: Original plus Attested Xerox copies of UG and PG marks memo, NET/SET/Ph.D. certificates and other necessary documents along with the application are necessary.
v) No TA/DA will be paid for attending the interview.

**Dr. L. P. Shinde**
**Principal**
Science College, Nanded

**Sow. Shyamal Patki**
**Secretary**
Nanded Education Society, Nanded


हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४